Vol II Issue X

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.



## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.10,Nov. 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भाषांतराची संकल्पना

**अरूण कोळेकर**

प्रमुख , मराठी विभाग
शरदचंद्रजी पवार महाविद्यालय , जेजुरी ता . पुरंदर , जि . पुणे .

***सारांश :***

भाषांतर भाषांतरशास्त्र ही अलिकडच्या काळातील एक महत्वाची अशी ज्ञानशाखा समजली जाऊलागली आहे . संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या या काळात जग आता अधिकाधिक जवळ येत आहे . त्यामुळे संपर्काची साधने आणि माध्यमे यांमध्ये आता आमूलाग्र असा बदल होऊलागल्याचे आपणांला दिसून येते . हे होणे स्वाभाविक असेच म्हणायला हवे . वेगवेगळया ज्ञानशाखांमधील ज्ञान दुर्स या भाषेत भाषांतरीत होऊलागले आहे . साहित्य कलाविज्ञानसामाजिक शास्त्रेमानव्यविद्या कलामीमांसा यांसारख्या विषयांवरील महत्वपूर्ण आणि उपयुक्त अशा ग्रंथांची भाषांतरे होताना दिसतात . त्यामुळे ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रातील हा मोकळेपणा अभ्युदयाच्या दृष्टीने उपकारकच म्हणता येईल .

***प्रस्तावना :***

जगामध्ये देशामध्ये भिन्न भिन्न प्रदेशात बोलणारे लोक राहतात . अशा लोकांच्या संस्कृतीचाभाषेचा समाजजीवनाचा अभ्यास करायचा असेल तर त्या त्या भाषेत निर्माण झालेले ग्रंथ भाषांतरीत करणे गरजेचे ठरले आहे . त्यामुळे भाषांतराची आवश्यकता निर्माण झाली आहे .

भाषांतराचा विचार चर्चा ही वेगवेगळया अंगांनी बांजूनी केली जाते . कधी भाषांतराची संकल्पान व तिचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो . काही वेळेस भाषांतर करीत असताना भाषांतरकाराला कोणत्या समस्यांना तोंड दयावे लागते याचा विचार केला जातोतर कधी भाषांतरामागील प्रेरणा प्रवृत्ती व होणाया परिणामांचा विचार केला जातो .

**अनुवाद भाषांतर रूपांतर ः**

अनुवाद भाषांतर या संज्ञा अलीकडे समानार्थी म्हणून वापरल्या जातात . वास्तविक संस्कृत भाषेत 'भाषांतर' हा शब्द बसतो . आजच्या आपल्या भाषा व्यवहारामध्ये 'भाषांतर' या शब्दाला स्वतंत्र असा पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे . इंग्रजीमधील Translation हा शब्द लॅटिनच्याTrans and lation यांच्या संयोगामधून तयार झाला आहे . अनुवाद या शब्दाचा अर्थ 'एखादयाच्या मागून बोलणे' असा आहे . हे बोलणे पुढीलप्रमाणे दोन प्रकारचे असू शकते . . 'एखादयाचे बोलून झाल्यावर प्रत्युत्तरादाखल बोलणे'आणि[२] . 'एखादयाच्या किंवा स्वतःच्या बोलण्याची पुनरावृत्ती करणे' .

अनुवाद या शब्दालाही अलिकडे स्वतंत्र असा पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आहे . 'पूर्वसिध्द मजकूराचे स्पष्टीकरण विवरण अथवा विस्तार' म्हणजे अनुवाद असा या शब्दाचा उपयोग आपण करतो . मोल्सवर्थच्या कोशात 'Repeating anothers speech or one's own tautology'असे अनुवादाचे अर्थ दिले आहेत . 'repetition ,repetition by way of explanation ,illustration or corroboration, explanatory repetition or reference to what is already mentioned such as paraphrase or free translation supplementary repetition' असे त्याचे अर्थ दिले आहेत . तर दाते यांच्या शब्दकोशात 'पुन्हा पुन्हा सांगणेपाठ करणेस्पष्ट करणे' अशा प्रकारचे अर्थ दिले आहेत .

अनुवादाचे वरील सर्व अर्थ आपण वापरत असलेल्या 'भाषांतर' या शब्दाच्या रूढ अर्थापेक्षा खूप व्यापक असल्याचे दिसून येते . या अनुवादामध्ये स्पष्टीकरण पुनरावृत्तीघोकंपट्टीगद्यरूपांतरपद्यरूपांतरटीका यांसारख्या सर्व प्रकारांचा समावेश होतो . यावरून अनुवाद ही संज्ञा भाषांतर या संज्ञेच्या तुलनेने खूपच व्यापक असल्याचे आढळून येते .

थोडक्यात अनुवाद ही व्यापक अशी संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावरीतिच्या एका प्रकाराचा निर्देश करणारी संज्ञा आहे असे म्हणता येईल .

अनुवादाची व्याख्या करताना यूजीन ए नाइडा (E.A.Nida)"लिहितात "Translating consists in producing in the receptor language the closest natural equiralent to the message of the source language, first in menaning and srcondly in style."[२]

तर अनुवादाचे विविध पैलू लक्षात घेऊन त्याची व्याख्या करताना डॉ . भोलानाथ तिवारी लिहितात "एक भाषा में व्यक्त विचारों को यथासम्भव समान और सहज अभिव्यक्ती द्वारा दूसरी भाषा में व्यक्त करने का प्रयास अनुवाद है | "

अशा प्रकारे अनुवादाच्या वेगवेगळया व्याख्या सांगता येतील .

**भाषांतर ः**

भाषांतरामुळे आपणाला दुसया भाषेचा त्या भाषिक संस्कृतीचा व त्या समाजाचा परिचय घडतो. नव्या संस्कृतीची, भाषेची आपणाला जर ओळख करून घ्यायची असेल तर त्यासाठी भाषांतराचाच मार्ग प्रस्तुत ठरतो. भाषेच्या वृध्दीसाठी साहित्याच्या विकासाठी भाषांतर ही पहिली प्रक्रिया मानली जाते. एका भाषेतील संहितेचा अर्थ शब्दशः दुसया भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे यालाच रूढ अर्थाने भाषांतर म्हणण्याची पध्दत आहे. पण भाषांतरामध्ये मुलकृतीचा शब्दशः अर्थ देण्याचा प्रयत्न तर असतोच. पण त्याचबरोबर मूळ कृतीतून जाणवणारा सौंदर्याचा अनुभव,वक्तृत्वाचा अनुभव, शैलीचा अनुभव वाचकांपर्यत पोहचविण्याच्या कौशल्यापेक्षा तिचा असणारा शब्दशः अर्थ शैली घटकांसह दुसया भाषेत उतरवण्याचे कौशल्य अधिक सूक्ष्म असते. याचाच विचार त्यामध्ये प्रामुख्याने होत असतो. भाषांतराची व्याख्या करताना डॉ. कल्याण काळे लिहितात, “भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर त्याचा आशय अभिव्यक्तीजन्य अनुभव यांसह दुसया भाषेत उतरविण्याची प्रक्रिया.”[३]

भाषांतर हे शेवटी मुळाचाच अनुवाद असते. भाषांतराचा मुख्य उद्देश आशयाची प्रतिनिर्मिती हा असतो. तोच जर भाषांतरकाराने नजरेआड केला तर त्या कृतीला भाषांतर म्हणता येणार नाही. भाषांतराची प्रक्रिया ही अवघड अशीच आहे. असे असले तरी भाषांतर प्रक्रिया मात्र अशक्य कोटीतील नाही. भाषांतराचा हा प्रवास कसा असता तो दाखविताना अंजली सोमण लिहितात, “मूळ ग्रंथातील आशयाचे विश्लेषण,त्या अनुभवाचे स्वतःच्या भाषेत अनुभवान्तरण आणि शेवटी स्वभाषेत केलेली त्याची पुनर्रचना हया प्रक्रियेतून भाषांतराचा प्रवास होत असतो.[४]” सोमण यांनी मांडलेला भाषांतराचा हा प्रवास दिशादर्शक आहे.

**रूपांतर ः**

भाषांतर हे मूळ साहित्यकृतीची किंवा इतर मजकुराची लक्ष्य भाषेत केलेली शब्दशः प्रतिनिर्मिती असते. पण काही वेळा व्यावहारिका कारणामुळे मूळ कलकृतीची,संहितेची शब्दशः प्रतिनिर्मिती करणे शक्य नसते. अशा वेळी लक्ष्यभाषेत फक्त त्या संहितेचा स्थूलाशय आणण्याचा प्रयत्न केला जातो. त्याला रूपांतर असे म्हणतात.

रूपांतराचा मूळातील उद्देश असा असतो की मूळ कलाकृतीचा मूळामधील विस्तार टाळावा आणि तिचा लक्ष्यभाषेत सुटसुटीत प्रतिनिर्मिती करावी. अशी रूपांतराच्या मागे अनेक वेळा रंजनात्मकतेचा उद्देशही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आख्यानकाव्ये निर्माण करीत असताना मुळातील प्राचीन पुराण कथांमधील कंटाळवाणा भाग कमी करून लक्ष्यभाषेत जी सुटसुटीत आख्यानकाव्याची रचना केली जाते. त्यामध्ये आपणाला रंजनात्मकतेचाच उद्देश असल्याचे दिसून येते. र्व याचवेळा मूळ कलाकृतीमध्ये अपरिचित असणारे किंवा परकीय असे वातावरण बदलून लक्ष्य भाषिकांना भावेल,आपलेसे होईल अशा पध्दतीने त्यांच्यासमोर उभे करणे हा ही रूपांतरापाठीमागे उद्देश असतो. यासंदर्भात गो. ब. देवलांनी शेक्स्पीअरच्या 'ऑथेल्लो' चे 'झुंझारराव'असे केलेले रूपांतर व वि. वा. शिरवाडकरांनी 'ऑथेल्लो'चे रूपांतर केले आहे.

रूपांतर करीत असताना मूळ कलाकृतीतील असणाया पात्रांची नावे बदलली जातात. स्थळ, काळ,राहण्या बोलण्याच्या पध्दती बदलल्या जातात. त्यामध्ये मूळ कृतीचा सर्व तोंडवळाच बदलला जातो. भाषांतर हे जितके एखादया संस्कृतीची वाङ्मयीन जडणघडण करण्यात महत्वपूर्ण योगदान देते,तितकेच रूपांतरही महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

**भाषांतराची आवश्यकता ः**

वाङ्मय व्यवहाराच्या क्षेत्रात भाषांतर ही गरजेची, आवश्यक ठरतात. भाषांतराअभावी इतर भाषांमधील असणाया विदग्ध वाङ्मयकृती, तिथला वाङ्मय व्यवहार आणि विचाराचे वैभव याचा परिचय घडून येणार नाही. कोणत्याही साहित्यनिर्मितीला इतर भाषेतील वाङ्मयनिर्मितीने तिच्यातील प्रयोगाने,त्यामध्ये असणाया विचारप्रवाहाने वैभव प्राप्त होत असते. त्यामुळे त्या भाषेची (लक्ष्य भाषेची) समृध्दी वाढत असते.

भाषांतरामुळे अनुभव विश्वाच्या मर्यादा ओलाडून ते विस्तारले जाते. दुसया भाषेशी,तिथल्या लोकसमुहाशी एक नवीन ओळख भाषांतरकाराला,वाचकाला होते. साहित्याचे वेगवेगळे धर्म समजतात. नानाविध लेखकांच्या लेखनाचे प्रतिभादर्शन,त्यांचे अनुभवविश्व, त्यांच्या प्रतिभेचा आविष्कार, त्यांची लेखन शैली,त्यातून अभिव्यक्त होणारी जीवनशैली यांचा प्रत्यय घडतो. भाषांतरासारखी ही निर्मीती मानवी समूहाचे जीवनदर्शन घडविते.

वाङ्. मयाच्या क्षेत्रात भाषांतराचे स्थान महत्वपूर्ण असे मानले जाते. एखादया नव्या संस्कृतीची भाषेची आपल्याला ओळख करून घ्यायची असेल तर भाषांतराचा मार्ग प्रस्तुत ठरतो. भाषेच्या समृध्दीसाठी, तिच्यामध्ये होणाऱ्या अभिसरणासाठी, साहित्याच्या अभिवृध्दीसाठी भाषांतराचा उपयोग होतो. कोणतेही श्रेष्ठ साहित्य, अभिजात साहित्य हे प्रमाणभाषेबरोबरच ते स्वत:च्या बोलीश, अनुभवांशी आणि आविष्काराच्या पध्दतीशी देवाणघेवाण करते. अनुभवाची नवनवीन क्षेत्रे धुंडाळण्यासाठी,सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यासाठी भाषांतराच्या माध्यमातून अनुभवाचे एक नवे सामर्थ्य अनुभवता येते. ज्या ज्या वेळी सांस्कृतिक देवाणघेवाणीची गरज भासते त्या त्या वेळी साहित्याची भाषांतरे केली जातात,करून घेतली जातात.

कोणत्याही भाषांतरीत कृतीला मूळ कलाकृतीचे सारे सौंदर्य,एक प्रकारचे शाश्वतपण, चिरंजीवित्व मिळणार नाही. ललित साहित्यकृतीच्या बाबतीत जर भाषांतरे ही तत्वतःअशक्य आणि व्यवहारामध्ये अवघड बाब असली,तरी सुध्दा ती गरजेची ठरतात. भाषांतराअभावी इतर भाषेतील वाङमयाशी जवळीकता न आल्यामूळे एखादया भाषेतील वाङमय एकसूरी,कंटाळवाणे,एका विशिष्ट आवर्तात सापडल्यासारखे वाटू लागते.

भाषांतरामुळे केवळ दोन भाषांमध्येच नव्हे तर दोन भाषिक समाजामध्ये,दोन संस्कृतीमध्ये आदान प्रदान होत राहते. हे आदानप्रदान त्या त्या सांस्कृतिक वाढीला साहाय्यभूत ठरत असते. जगामधील भिन्नभिन्न प्रदेशात राहणाया, वेगवेगळया भाषा बोलणाया, अनेक वंशाच्या, संस्कृतीच्या आर्थिक स्तरावरच्या समाजाशी संपर्क साधण्यासाठी, त्या समाजाचा परिचय होण्यासाठी या सर्वामध्ये एक प्रकारचा सु. संवाद, समन्वय, भाषिक, सांस्कृतिक पूल बांधणीसाठी भाषांतराची नितांत आवश्यकता असते.

**भाषांतर करताना घ्यावयाची काळजी, येणाया अडचणी ः**

भाषांतर करीत असताना भाषांतर कर्त्याला मूळ भाषेतील कलाकृती,संहिता संपूर्णपणे आकलन झाली असेल, त्यामधील सर्व शब्द, त्यातून व्यक्त होणारा भावाशय नीट समजला असेल,ज्या भाषेत भाषांतर करायचे त्या भाषेच्या चिन्हव्यवस्थेशी त्यांचा जर चांगला परिचय असेल तर मूळ संहितेशी समांतर असलेला व्यूह आपोआपच तयार होतो. जर भाषांतर कर्त्याला मूळ भाषेतील संहितेचे आकलन झाले नाही आणि लक्ष्यभाषेतील चिन्ह व्यवस्थेचा परिचय नसेल तर भाषांतरामध्ये एक प्रकारचा सदोषपणा निर्माण होतो. भाषांतराचे यश आणि अपयश हे भाषांतरकाराला झालेले आशयाचे ज्ञान, शब्दाचे ज्ञान आणि लक्ष्य भाषेतील चिन्ह व्यवस्थेशी असलेला त्याचा परिचय यावरून निश्चित होत असते.

एका विशिष्ट भाषेतून एखादी साहित्यकृती जेव्हा जन्माला येते, तेव्हा तिच्यात अप्रत्यक्षपणे तिच्या आशयाची वेगवेगळया विचारांचे प्रवाह, व्यूह संबधीत असतात. त्या भाषेतून जाणवणारे सामाजिक, सांस्कृतिक वातावरण, त्या भाषिक समूहाचा इतिहास, त्या समूहाचे समाजशास्त्र,तत्वविचार, साहित्यविचार या सर्वाचे प्रतिबिंब

साहित्यकृती मधील आशयामध्ये पडत असते. अशा व्यामिश्र संमिश्र व्यवहारातुन ती साहित्यकृती उचलून लक्ष्य भाषेत भाषांतरीत करावयाची असते. हे करीत असताना दोन भाषांमधील भाषिक प्रश्न. व्याकरणिक प्रश्न यांचाही विचार करावा लागतो. यामुळे भाषांतरकराचे काम अतिशय अवघड होते.

साहित्यकृतीचे भाषांतर करीत असताना भाषांतर कर्त्यासमोर अनेक प्रश्न असतात. दोन भाषांमधील असणारे संरचनात्मक भेद सांस्कृतिक साम्य-भेद यांसारखे काही ठळक प्रश्न आहेत. भाषांतरकाराला वाङमयप्रकारानुसार काही तरतमभाव करता येईल. पण सर्वच ललित साहित्यप्रकारच्या बाबतीत त्यांना अनेक अडचणींना तोंड दयावे लागते.

भाषांतरकाराला मूळ कलाकृती ज्या अनेक सांस्कृतिक पिंडातून घडली त्याची संपूर्ण ओळख असणे गरजेचे असते. एका विशिष्ट सांस्कृतिक वातावरणातून, कलाकृती जेव्हा दुसया भाषेत संक्रमित होत, तेव्हा भाषांतरकाराला अनेकविध समस्यांना सामोरे जावे लागते. सांस्कृतिक दरी ओलांडण्यासाठी काही वेळा वाङमयकृतीपासून मर्यादित स्वरूपात दूर जाण्याचे स्वातंज्यही त्याला घ्यावे लागते.

भाषांतरात शब्दश: भाषांतराला प्राधान्य असण्यापेक्षा मुळातील चैतन्याला प्राध्यान्य असले पाहिजे. सांस्कृतिक आणि भाषिक यांमधील असणारी दरी ओलांडून मूळ कलाकृतिच्या मर्माचे ग्रहण करता आले पाहिजे. हे करीत असताना एकसंध अशा आस्वादाला तडा जाता कामा नये. यासाठी भाषांतरकर्त्याने स्वत: रसिक असणे गरजेचे आहे. दोन भाषांचे सखोल ज्ञान आणि त्या भाषातील सांस्कृतिक विश्व यांचा जवळून परिचय असायला हवा. अतिशय गंभीरपणाने मूळ कलाकृतीला न्याय देता येईल अशा तयारीनिशी भांषांतरकर्त्याने त्या कलाकृतीशी एकरूपता साधली पाहिजे.

कोणतीही भाषा असो, त्या भाषेला स्वत: चे एक स्वयंसिध्द असे रूप असते, स्वभाव असतो, भूतकाळ असतो. भाषांतरकाराला या सर्वाची योग्य जाण असावी लागते. भाषांतर करीत असताना त्या भाषेतील अभिव्यक्तीचे व शब्दांचे सांस्कृतिक, भाषिक व ध्वनित अर्थ जाणून घ्यायचे असतील तर त्या प्रदेशाची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थितीचा अभ्यास असायला हवा. मूळ साहित्यकृती आणि भाषांतरित साहित्यकृती यामध्ये भाषांतरकाराची भूमिका निर्विवादपणे महत्वाची असते. पण वाचकाला आपण ती साहित्यकृती मुळातूनच वाचतो आहोत, असे वाटणे म्हणजे त्या भाषांतरकर्त्याचे यशच म्हणता येईल.

कोणत्याही साहित्यकृतीला त्या त्या भाषिक समाजाच्या चौकटीत एक प्रकारच्या वास्तवतेचा संर्दभ असतो. असे संदर्भ भाषांतरकर्त्याला नजरेआड करता येत नाहीत. कारण या संदर्भामधूनच त्या साहित्यकृतीला संस्कृतिनिष्ठ, भाषानिष्ठ संदर्भाची चौकट लाभत असते. त्यातून प्रतिमांची निर्मिती होत असते. भाषांतर विशेषत: ललित भाषांतर हा मूळाचा संपूर्ण कायाकल्प असतो. भाषांतरकर्त्याने त्या कलाकृतीला एक आपलेपणा दिलेला असतो. त्यामधील जिवंतपणाचा, समृध्दतेचा, सौदर्यानुभावाचा एक वेगळा प्रत्यय तो वाचकांना आणून देत असतो. त्यामुळे मर्यादित अर्थाने का असेना भाषांतर ही एक नवनिर्मितीच असते असे म्हणता येईल.

**भाषांतराचे मूल्यमापन :-**

भाषांतराचे मूल्यमापन ही एक अवघड बाब आहे. कारण भाषांतर चांगले झाले किंवा नाही हे ठरविण्यासाठी कोणतेही वस्तुनिष्ठ असे निकष नाहीत. आपण कशाला, कोणत्या बाबींना अग्रक्रम देणार हा आपल्यापुढील प्रश्न असतो. बऱ्याच वेळा भाषांतराच्या मूल्यमापनामध्ये वैयक्तिक विचारांचा, मतांचा प्रभाव पडताना दिसतो. भाषांतर चांगले झाले आहे की बरोबर झाले आहे यामध्ये आपण कशाला प्राधान्य देणार हा मूल्यमापनामधील खरा प्रश्न आहे.

भाषांतराचे मूल्यमापन करीत असताना त्या संदर्भातील वस्तुनिष्ठ निकष जर नसतील तर त्याचा आग्रह धरू नये असे काही अभ्यासकांचे मत आहे. या संदर्भात डॉ. द. भि. कुलकर्णी लिहितात, " आपण अनुवादित कलाकृतीकडे एक कलाकृती म्हणूनच निरपेक्षपणे पाहिले पाहिजे. एखादया कलाकृतीच्या आस्वादासाठी तिच्या पलीकडे जाऊन क्षणाक्षणाला संदर्भ प्रस्थापित करणे हे रसविघ्न होय. नव्हे ते तिचे कलाकृतीपण नाकारणारे होय." भाषांतरित कृती ही जरी भाषांतरीत असली तरी सुध्दा ती स्वतंत्र निर्मिती समजून तिचे मूल्यमापन व्हायला हवे असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची**

१. युजीन नायडा, ' लैंग्विज स्ट्रक्चर एण्ड ट्रान्सलेशन ', स्टैनफोर्ड, १९७५ पृ. २३.
२. भोलानाथ तिवारी, ' अनुवाद विज्ञान ', शब्दकार १९८७ पृ. १८.
३. (संपादक) कल्याण काळे, अंजली सोमण, ' भाषांतर मीमांसा ', प्रतिमा प्रकाशन १९७७, पृ. ११ .
४. तत्रैव. पृ. ५२.
५. द. भि. कुलकर्णी, ' सत्यकथा ' जानेवारी १९७0 पृ . ५३

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net